11 SEP 2018
तरूण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# भारतीय अभियंत्यांना जपानमध्ये मोठी संधी

▪ जपानच्या डॉ. केयी नोडा

▪ शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागात चर्चासत्रात मार्गदर्शन

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचे जपानच्या केयी युनिव्हर्सिटीशी चांगले संबंध आहेत, तसेच दरवर्षी जपानला अभियांत्यांची आवश्यकता असते. त्यामुळे भारतीय अभियंत्यांना जपानमध्ये चांगल्या संधी आहेत. असे डॉ. केयी नोडा यांनी सांगितले.

शिवाजी विद्यापीठ तंत्रज्ञान अधिविभागात जपानच्या केयी युनिव्हर्सिटीच्या डिपार्टमेंट ऑफ इलेक्ट्रॉनिक्स अँड इलेक्ट्रिकल इंजिनीरिंगचे प्रोफेसर डॉ. केयी नोडा यांचे 'सेमीकंडक्टर फिल्म प्रिपरेशन बाय सोलुशन बेस्ड प्रोसेस टुवर्डस



इलेक्ट्रॉनिक डिव्हायसेस ॲप्लिकेशन अँड फोटोएनर्जी" या विषयावर चर्चासत्राचे आयोजन केले होते. या चर्चासत्रात ते बोलत होते. जापनीज शिक्षण प्रणाली व औद्योगिक प्रगती याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

विभागाचे संचालक डॉ जयदीप बागी म्हणाले, भारतीय उद्योग व अर्थव्यवस्थेच्या विकासामध्ये इलेक्ट्रॉनिक सिस्टिम डिझाईन अँड मॅन्युफॅक्चुरिंग या प्रणालीचा उपयोग असून याचा औद्योगिक क्षेत्रवाढीस मोठा सहभाग आहे. जापनीज कंपन्या जसे सोनी, टोयोटा, होंडा यांची भारतात उत्पादन सुविधा आहे. तसेच ऑटोमोबाईल क्षेत्रामधील बहुराष्ट्रीय मारुती सुझुकी ही भारत व जपान यांची भागीदारी कंपनी असून भारतात व जपानमध्ये भारतीय अभियंत्यांना शिक्षणाची व कामाची संधी निर्माण करत आहे.

डॉ. नोडा यांच्या संशोधनाची माहिती विभागातील ट्रेनिंग आणी प्लेसमेंट समन्वयक डॉ.एस.बी. सादळे यांनी दिली. तसेच इलेक्ट्रॉनिक्स उद्योगामध्ये भारत सरकार विविध धोरण, प्रोत्साहने आणि आंतरराष्ट्रीय गुंतवणूकीद्वारे मदत देत आहे. याची माहितीही यावेळी त्यांनी दिली.

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी मार्गदर्शन केले. तसेच प्र. कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के व कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर यांचे प्रोत्साहन लाभले. यावेळी सेलचे कोऑर्डिनेटर प्रा. उदय पाटील उपस्थित होते.

# ध्येय गाठण्यासाठी संघर्ष हवाच



महावीर कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांचा सत्कार करताना शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. यावेळी उपस्थितांत डावीकडून डॉ. शरद गायकवाड, डॉ. अरुण पाटील, गुणवंत रोटे, महावीर देसाई, ॲड. के. ए. कापसे, प्रा. एस. एम. पाटील आदी.

## प्र-कुलगुरू डॉ.डी.टी. शिर्के याचे प्रतिपादन

कोल्हापूर : 'ध्येय गाठावयाचे असेल तर संघार्षाला पर्याय नाही. जग फार मोठे आहे. करिअरच्या अफाट संधी उपलब्ध आहेत. त्यासाठी अभ्यासक्रमाबरोबरच चौकटीच्या बाहेर जाऊन चांगल्या पुस्तकांचे वाचन करणे गरजेचे आहे,' असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. महावीर महाविद्यालयात आयोजित केलेल्या विद्यार्थी गुणगौरव समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष ॲड. के. ए. कापसे होते. यावेळी महाविद्यालय व विद्यापीठीय स्तरावर यश मिळविलेल्या २२ गुणवंत विद्यार्थ्यांना प्रमुख मान्यवरांच्या हस्ते कै. दादोबा लडगे ट्रस्टतर्फे स्मृतिचिन्ह व गौरवपर प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ. आर. पी. लोखंडे प्रमुख उपस्थित होते.

डॉ. शिर्के म्हणाले, 'संघर्ष हा असायलाच हवा. त्याशिवाय कोणताही आनंद मिळणार नाही. आपल्याकडे खूप क्षमता आहेत. हिमा दास, नवनाथ गोरे, अंध फातिमा मुल्लाणी, राही सरनोबत, यांचे सुवर्ण यश दिसते. पण त्यामागे असलेला त्यांचा संघर्ष लक्षात घेणे गरजेचे आहे. यशस्वीतेच्या पलिकडे जाऊन काही गोष्टी मिळवायला व वाचायला शिकल्या पाहिजेत. त्यासाठी अभ्यासातील गुणाबरोबरच कौशल्याची वाढ होणे गरजेचे आहे. करिअरला बंधने नसतात म्हणून विद्यार्थ्यांनी ज्या क्षेत्राची आपल्याला आवड आहे ते क्षेत्र निवडून त्यात प्राविण्य मिळविणे ही काळाची गरज आहे. शिकणे ही प्रक्रिया कधीही संपत नाही. त्यासाठी वाचनाचे चांगले व्यसन लावून घेणे गरजेचे आहे. अभ्यासक्रमाच्या बाहेर जावून वाचायला हवे.'

ॲड. के. ए. कापसे म्हणाले, 'श्रम करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव होतो. जेथे शिक्षक समर्पित वृत्तीने काम करतो तेथेच गुणवंत विद्यार्थ्यांचा विकास होतो. या महाविद्यालयात चार भिंतीच्या पलिकडे जाऊन विद्यार्थ्यांना चांगल्या क्षेत्रात करिअर करता येईल, असे शिक्षण येथे देण्याचा प्रयत्न संस्था करते. समाजात शांतता, स्थैर्य राखणे हाच खरा शिक्षणाचा उद्देश असतो.'

यावेळी अंध विद्यार्थीनी फातिमा मुल्लाणी हिने आपले मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष प्रा.एस. एम. पाटील, कार्यवाह महावीर देसाई, संचालक गुणवंत रोटे, विशाल लडगे, डॉ. अरुण पाटील, डॉ. शरद गायकवाड आदींसह विद्यार्थी उपस्थित होते. स्वागत व प्रास्ताविक प्राचार्य डॉ. लोखंडे यांनी केले. परिचय प्रा. संध्या जाधव यांनी तर सूत्रसंचालन डॉ. श्रद्धा पाटील यांनी केले.